Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# दुष्काळाचे लातूर जिल्ह्यातील विकासावर झालेले परिणाम : एक अभ्यास

**संशोधक**
**पाटील सचिन मोहनराव**

**मार्गदर्शक**
**डॉ. एल. एच. पाटील**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता. उदगीर जि. लातूर

**प्रस्तावना**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये लातूर जिल्ह्याच्या विकासावर झालेले परिणाम या संशोधनात नमुना निवडीच्या संभाव्य नमुना निवड पध्दतीचा वापर केलेला आहे. संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यांची निवड केली असून प्रत्येकी तालुक्यातील दहा गावे निवडली आहेत. एका गावातून ५ प्रमाणात म्हणजेच ५० लाभार्थ्यांची निवड केली. म्हणजे एकूण ५०० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून ५०० प्रश्नावलींच्या द्वारे तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. समोर आलेल्या तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिवर्चन खालील प्रमाणे करण्यात आले आहे. आवश्यक त्या ठिकाणी योग्य प्रमाणे स्तंभालेख व वर्तुळाच्या माध्यमातून प्रमाण दर्शविण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती :** सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील सर्वेक्षणात्मक, सांकिख्खीय आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.


**संशोधनाची उद्दिष्टे :** प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. दुष्काळाच्या प्रमुख कारणांचा अभ्यास करणे.
२. दुष्काळाचे लातूर जिल्ह्याच्या विकासावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. दुष्काळाचे आरोग्यावर झालेले परिणामांचा अभ्यास करणे.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीला असलेले जलसिंचनाचे स्त्रोत**

शेतीसाठी जलसिंचनाची सुविधा असणे खूप गरजेचे असते. सिंचनाची सुविधा असेल तर पिकांच्या गरजेनुसार वेळेवर पाणी देता येते व त्यामुळे उत्पादनात वाढ होते. म्हणून दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबाकडे शेतीसाठी जलसिंचनाचे कोणते स्त्रोत आहेत यांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

| अ.क्र. | जलसिंचनाचा स्त्रोत | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विहीर | १२० | २४.०० % |
| २ | कुपनलिका (बोरवेल) | ३० | ०६.०० % |
| ३ | विहीर व कुपनलिका | ५० | १०.०० % |
| ४ | तलाव | ३५ | ०७.०० % |
| ५ | नदी | ०५ | ०१.०० % |
| ६ | कोणताही स्त्रोत नाही | २४० | ४८.०० % |
| ७ | लागू नाही | २० | ०४.०० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.०० %** |




वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये शेतीस उपलब्ध असलेले जलसिंचनाच्या स्त्रोताची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, दुष्काळग्रस्त ५०० शेतकरी कुटुंबापैकी २४० कुटुंबाकडे जलसिंचनाचे वेगवेगळे स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (४८%) आहे. २० कुटुंबांना शेती नसल्यामुळे त्यांच्याकडे कोणतेही जलसिंचनाचे स्त्रोत नाहीत. ज्यांच्याकडे जलसिंचनाचा स्त्रोत आहे, त्यामध्ये १२० कुटुंबाकडे विहीर हा स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (२३%) आहे. ३० कुटुंबाकडे कुपनलिका (बोअरवेल) हा स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (०६%) आहे. ५० कुटुंबाकडे विहीर व कुपनलिका (बोअरवेल) हा स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (१०%) आहे. तर ३५ कुटुंबांना तलाव हा स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (०७%) आहे. ०५ कुटुंबाला नदी हा स्त्रोत असून त्यांचे शेकडा प्रमाण (०१%) आहे. उपलब्ध आहे.


एकंदरीत आजही जवळपास ५०% कुटुंबाकडे जलसिंचनाचा कोणताही स्त्रोत नाही. तर ५०% कुटुंबाकडे जलसिंचनाचे स्त्रोत आहेत. जलसिंचनाच्या स्त्रोतात प्रामुख्याने विहीर व कुपनलिकांचे प्रमाण जास्त आहे. तर अल्पप्रमाणात काही लोकांना तलाव व नदीद्वारे पाणी उपलब्ध आहेत. दुष्काळग्रस्त बहुतांश शेतकरी कुटुंबाकडे आज ही जलसिंचनाचा कोणताही स्त्रोत नाही. ज्यांच्याकडे आहे त्यात विहीर व कुपनलिका असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. परंतु हे स्त्रोतही बारमाही उपलब्ध नाहीत.

**दुष्काळाचे अन्न धान्याच्या उत्पन्नावर झालेले परिणाम**

लातूर जिल्ह्यात दुष्काळ पडल्यामुळे अन्न धान्यावर त्यांचा विपरीत परिणाम झाला होता. शेतकऱ्यांचे उत्पादन घटल्यामुळे अन्न धान्याच्या किमतीमध्ये भरमसाठ वाढ नोंदविली गेली. याच अनुषंगाने अन्न धान्यावर झालेल्या परिणामांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

| अ.क्र. | अन्न धान्यावर झालेले परिणाम | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पीक पेरणी झाली नाही | ९७ | १९.४० % |
| २. | अन्न धान्य उत्पादनात घट | २७ | ०५.४० % |
| ३. | अन्न धान्याच्या किमतीत झपाट्याने वाढ | २९० | ५८.०० % |
| ४. | सामान्य शेतकऱ्यांवर उपास मारीची वेळ | ७० | १४.०० % |
| ५ | वरील पैकी सर्व | १६ | ०३.२० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.००%** |





वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये दुष्काळाचे लातूर जिल्ह्यातील दुष्काळामुळे अन्न धान्यावर झालेल्या परिणामांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, ९७ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे पीक पेरणी झाली नाही असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १९.४० टक्के आहे. २७ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे अन्न धान्य उत्पादनात घट झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५.४० टक्के आहे. २९० उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे अन्न धान्याच्या किमतीत झपाट्याने वाढ झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५८ टक्के आहे. ७० उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे सामान्य शेतकऱ्यांवर उपास मारीची वेळ आली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १४ टक्के आहे. १६ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे वरील पैकी सर्वच समस्या निर्माण झाल्या असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ३.२० टक्के आहे.

एकंदरीत लातूर जिल्ह्यात दुष्काळ पडल्यामुळे अन्न धान्याचे उत्पादन घटल्यामुळे अन्न धान्याच्या किमतीमध्ये भरमसाठ वाढ झाल्याने त्यांचा सर्व सामान्य शेतकऱ्यांना फटका बसला.

**दुष्काळाचे रोजगारांच्या निर्मितीवर झालेले परिणाम**

लातूर जिल्ह्यात दुष्काळ पडल्यामुळे कृषी आणि कृषी पुरूक उद्योगांवर त्यांचा विपरित परिणाम झाला. यामुळे रोजगारांमध्ये झपाट्याने घट झाल्यामुळे सर्व अल्प भूधारक शेतकऱ्यांना रोजगारांसाठी स्थलांतर करावले लागले. याच अनुषंगाने रोजगारांवर झालेल्या परिणामांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

| अ.क्र. | रोजगारांवर झालेले परिणाम | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कृषी पूरक उद्योग बंद पडले | ३१ | ०६.२० % |
| २. | रोजगारांत झपाट्याने घट झाली | १७९ | ३५.८० % |
| ३. | रोजगारांअभावी बेकारी वाढली | ५५ | ११.०० % |
| ४ | रोजगारांअभावी उपासमारी वाढली | ५७ | ११.४०% |
| ५. | अल्प भूधारक शेतकऱ्यांचे स्थलांतर | ९० | १८.०० % |
| ६. | वरील पैकी सर्व | ८८ | १७.८० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.००%** |




वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये लातूर जिल्ह्यातील दुष्काळामुळे रोजगारांवर झालेल्या परिणामांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, ३१ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे कृषी पूरक उद्योग बंद पडले असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.२० टक्के आहे. १७९ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे रोजगारांत झपाट्याने घट झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ३५.८० टक्के आहे. ५५ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे रोजगारांअभावी बेकारी वाढली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ११ टक्के आहे. ५७ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे रोजगारांअभावी उपासमारी वाढली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ११.४० टक्के आहे. ९० उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे अल्प भूधारक शेतकऱ्यांचे स्थलांतर झाले असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १८


टक्के आहे. तर ८८ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे वरील पैकी सर्वच समस्या निर्माण झाल्या असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १७.८० टक्के आहे.

लातूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही कृषी आणि कृषी पुरक व्यवसायावर अवलंबून होती. परंतु दुष्काळ पडल्यामुळे कृषी आणि कृषी पुरक उद्योग बंद पडल्याने रोजगारांना इतर शहरांमध्ये स्थलांतर करावे लागले.

**मराठवाडा व लातूर जिल्ह्यातील पडलेल्या दुष्काळाचे प्रमुख कारणे**

मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यावर पडलेल्या दुष्काळाला अनेक कारणे जबाबदार आहेत. यामध्ये भरमसाठ प्रमाणात झालेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, वाढते प्रदूषण, अवर्षनग्रस्त भाग, सपाठ भूप्रदेश, रस्ते व सिमेंटच्या घराचे वाढते जंगल आणि ग्रीन हाऊसचे अती वापर इत्यादी कारण दुष्काळाला कारणीभूत आहेत. याच अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील दुष्काळाचा आढावा खालील तक्त्यात घेतला आहे.

| अ.क्र. | दुष्काळाचे कारणे | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | जंगलाचे प्रमाण कमी | १२० | २४.०० % |
| २. | भरमसाठ प्रमाणात झालेली वृक्षतोड | ४२ | ०८.४० % |
| ३. | अवर्षनग्रस्त भाग | ४५ | ०९.०० % |
| ४ | सपाठ भूप्रदेश | १४० | २८.०० % |
| ५. | रस्ते व सिमेंटच्या घराचे वाढते जंगल | ९१ | १८.२० % |
| ६. | ग्रीन हाऊसचे वाढते प्रमाण | ६२ | १२.४० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.००%** |





वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये लातूर जिल्ह्यावर पडलेल्या दुष्काळाच्या कारणांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, १२० उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण कमी झाल्यामुळे

दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २४ टक्के आहे. ४२ उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्यात भरमसाठ प्रमाणात झालेली वृक्षतोडीमुळ दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.४० टक्के आहे. ४५ उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्याचा भाग अवर्षनग्रस्त भागात येत असल्याने दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९ टक्के आहे. १४० उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्याचा भाग सपाठ असल्याने दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २८ टक्के आहे. ९१ उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये रस्ते व सिमेंटच्या घराचे वाढते जंगल झाल्यामुळे दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १८.२० टक्के आहे. तर ६२ उत्तरदात्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये ग्रीन हाऊसचे प्रमाण वाढल्यामुळे दुष्काळ पडला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १२.४० टक्के आहे.

**दुष्काळाचे सामाजिक विकासावर कोणते परिणाम झाले**

दुष्काळ ओला असो की कोरडा त्यांचे समाजावर दुरगामी परिणाम होत असतात. यामध्ये समाजव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात लोकांचे होणारे स्थलांतर, उपासमार, कुपोषण, मानसिक ताणतणाव, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय अशा प्रकारचे परिणाम होत असतात. याच अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या सामाजिक विकासावर झालेल्या परिणामांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली.

| अ.क्र. | परिणामांचे स्वरूप | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लोकांच्या स्थलांतरात वाढ झाली | ७८ | १५.६० % |
| २. | उमासमार वाढली | ६३ | १२.६० % |
| ३. | लेकरांचे कुपोषण वाढले | ८९ | १७.८० % |
| ४. | मानसिक ताणतणाव वाढला | १२४ | २४.८० % |
| ५. | शिक्षणात व्यत्यय आला | ५१ | १०.२० % |
| ६. | सामाजिक संघर्ष वाढला | ९५ | १९.०० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.०० %** |




वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये लातूर जिल्ह्यातील दुष्काळाचे सामाजिक जीवनावर कोणते परिणाम झाले यांची माहिती देण्यात आली आहे. यावरून स्पष्ट होते की, ७८ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या स्थलांतरात वाढ झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.६० टक्के होते. ६३ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांमध्ये उपासमार झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १२.६० टक्के होते. ८९ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या लेकरांचे कुपोषण वाढले असू म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १७.८० टक्के होते. ८९ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या लेकरांचे कुपोषण वाढले असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १७.८० टक्के होते. १२४ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबात मानसिक ताणतणाव वाढला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २४.८० टक्के होते. ५१ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या मुला मुलींच्या शिक्षणात व्यत्यय आला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १०.२० टक्के होते. तर ९५ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदीन जीवनात संघर्ष वाढला असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १९ टक्के होते.

एकंदरीत लातूर जिल्ह्यातील दुष्काळामुळे तेथील शेतकऱ्यांना दैनंदिन जीवन विस्कळीत झाल्याने लोकांचे स्थलांतर, उपासमार, कुपोषण, मानसिक ताणतणाव, शिक्षणात व्यत्यय आणि सामाजिक संघर्ष इत्यादी कारणे उदभवून सामाजिक विकासात अडचण निर्माण झाली.

**दुष्काळाचे आरोग्य विकासावर झालेले परिणाम**

लातूर जिल्ह्यातील वाढत्या दुष्काळाचे तेथील शेतकऱ्यांच्या आरोग्यावर दुरगामी परिणाम झाले. यामध्ये स्वच्छ पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने कॉलरा, अतिसार, हगवण आणि कुपोषण यासारख्या आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या. याच अनुषंगाने खालील तक्त्यात माहिती देण्यात आली.

| अ.क्र. | आरोग्यावरील परिणाम | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वच्छ पाणी टंचाई | २५३ | ५०.६० % |
| २. | कॉलरा | ६१ | १२.२० % |
| ३. | हगवण | ४९ | ०९.८० % |
| ४. | अतिसार | ३१ | ०६.२० % |
| ५. | कुपोषण | ५६ | ११.२० % |
| ६. | वरील सर्व | ५० | १०.०० % |
| | **एकूण** | **५००** | **१००.०० %** |




वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये लातूर जिल्ह्यातील दुष्काळाचे आरोग्यावर कोणते परिणाम झाले यांची माहिती देण्यात आली आहे. यावरून स्पष्ट होते की, २५३ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे स्वच्छ पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५०.६० टक्के होते. ६१ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे कॉलरा समस्या निर्माण झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १२.२० टक्के होते. ४९ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे हगवण समस्या निर्माण झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५९.८० टक्के होते. ३१ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे अतिसार समस्या निर्माण झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.२० टक्के होते. ५६ उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे कुपोषण समस्या निर्माण झाली असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ११.२० टक्के होते. ५० उत्तरदात्यांनी दुष्काळामुळे वरील समस्या निर्माण झाल्या असे म्हटले असून त्यांचे प्रमाण १० टक्के होते.

एकंदरीत दुष्काळामुळे स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा होऊ शकल्यामुळे आरोग्य विकासावर परिणाम झाल्याचे ५१ शेतकऱ्यांनी म्हटले आहे. तर स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठ्या ऐवजी हगवण, अतिसार, कॉलरा आणि कुपोषण सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**सारांश**

प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. याच अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या शेती विषयक, शेती विषयी माहितीदुष्काळाचे लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर झालेल्या परिणामांची माहिती आणिदुष्काळाचे लातूर जिल्ह्याच्या सामाजिक स्थितीवर झालेल्या परिणामांच्या माहितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. तसेच विश्लेषणात्मक माहितीचे आवश्यक त्या ठिकाणी तक्ते, स्तंभालेख आणि वर्तुळाच्या माध्यमातून सरासरी प्रमाण दाखविण्यात आले आहे.

संदर्भ:

सोमनाथ घोळावे, केदार मगर, - महाराष्ट्रातील दुष्काळ, प्रकाशन: द युनिक अॅकॅडमी, पुणे (The Unique Academy, Pune)

Sainath, P. (1996). Everybody loves a good drought: Stories from India's poorest districts. Penguin Books India.

Sen, A. (1981). Poverty and famines: An essay on entitlement and deprivation. Oxford University Press. https://doi.org/10.1093/0198284632.001.0001